महाराष्ट्र शासन

**ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई-४०० ००१**

**दूरध्वनी क्र.**(०२२) २२६७१३३३ / २२६६४६३८ **फॅक्स क्र.**(०२२)२२६६४६३८

**Website:**-www.dol.maharashtra.gov.in **E-mai** -director.dol@maharashtra.gov.in

जा.क्र.३१/ग्रंथ खरेदी /२०२२-२३/ ४५०८ दिनांक :- १४.०७.२०२२

**(ई-मेलव्दारे)**

**प्रति,**
**२७३ प्रकाशक/विक्रेते/मुद्रक**

**विषय:- राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता योजनेंतर्गत करण्यात येणारी सन २०२१-२२ मधील ग्रंथखरेदी...**

**संदर्भ:-** १) राज्य ग्रंथालय नियोजन समितीच्या दिनांक २०.१२.२०२१ रोजीच्या मंजूर इतिवृत्तानुसार

२) ग्रंथालय संचालनालयाचे जा.क्र. ग्रंथ खरेदी आ.क्र.१/२०२२-२३/३१०३-३३७६, दि. २१.०६.२०२२

**महोदय,**

राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानतर्फे शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांकरिता ग्रंथालय संचालनालयाकडून सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील सन २०१७ मधील प्रकाशित ग्रंथ व राज्य ग्रंथालय नियोजन समितीकडून निवड करण्यात आलेल्या ग्रंथांच्या प्रतीनुसार पुरवठा शासकीय सुट्टीचे दिवस वगळून दि. ११.०७.२०२२ ते दि. १५.०७.२०२२ पर्यत सकाळी ११.०० ते संध्याकाळी ५.०० या वेळेत तिर्थरुप डॉ. नानासाहेब धर्माधिकारी ग्रंथालय, राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाचे उपकेंद्र – पहिला मजला, वेदांत कॉम्प्लेक्स समोर, S२/१७, आचार्य अत्रे मार्ग, वर्तकनगर, ठाणे - ४००६०६ पोच करणेबाबत संदर्भ क्र. २ च्या आदेशांन्वये संबंधित प्रकाशक/विक्रेते/मुद्रक यांना कळविण्यात आले आहे.

तथापि महाराष्ट्रात सदर कालावधीत सर्वदूर अतिवृष्टी झाल्यामुळे ग्रंथांच्या प्रतींचा पुरवठा वेळेत करण्यास अनेक प्रकाशक/विक्रेते/मुद्रक यांना अडचण होत असल्याने ग्रंथ पुरवठा करण्यासाठी मुदत वाढवून मिळणेबाबत अनेक प्रकाशकांनी ग्रंथालय संचालनालयास विनंती केली आहे.

गत काहीं दिवसांपासून राज्यात सूरु असलेली अतीवृष्टी व संबंधितांकडून प्राप्त विनंती पत्र इत्यादी बाब विचारात घेऊन उपरोक्त ग्रंथ पुरवठा करण्यासाठी **मंगळवार दिनांक २६.०७.२०२२ रोजी कार्यालयीन वेळे पर्यंत मुदत वाढ देण्यात येत आहे.**

आपली विश्वासू,

(शालिनी गो. इंगोले)
**प्र. ग्रंथालय संचालक**